# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Shirpur**

**Date of Good Work done** :- **23/08/2022**

**Brief of the work done :-**

चोरीला गेलेल्या म्हशी परत मिळाल्याने शेतकऱ्याने काढली हलगी वाजवत मिरवणूक ; पो.स्टे.शिरपूर पोलिसांचे मानले आभार.

# जनावरे चोरणाऱ्या पाच आरोपींना शिरपूर पोलीसांनी केले जेरबंद

देशोन्नती वृत्तसंकलन...

**शिरपूर** ■ शिरपूर पोलीस स्टेशन हद्दीतील शेलगांव बगाडे येथील उत्तम श्रीराम श्रीखंडे यांच्या गोठ्यातील दोन म्हशी एकुण किंमत अंदाजे ७० हजार रु. च्या कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी ९ जुलै रोजी रात्री १० वा. ते १० जुलै रोजी सकाळी ५ वा. च्या सुमारास चोरुन नेल्या बाबत उत्तम श्रीराम श्रीखंडे रा. शेलगांव बगाडे पोलीस स्टेशन शिरपुर येथे दिलेल्या रिपोर्ट वरुन अज्ञात चोरट्यां विरुद्ध अपराध क्रमांक २११/२०२२ कलम ४६१, ३८० भा.दं.वि. अन्वये गुन्हा ११ जुलै रोजी नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याचे तपासात रेकॉर्ड वरील गुन्हेगार, माहितीगार गुन्हेगार तसेच स्थागुशा वाशिम यांच्याकडुन प्राप्त सजेशन नुसार तपास करण्यात आला.



सायबर सेल वाशिम येथील टिम यांचे मदतीने तसेच प्राप्त गोपनिय माहिती नुसार १९ रोजी शिरपुर पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री. सुनिल वानखडे यांनी पथक गठित केले. सदर पथकाने गुन्ह्यातील ५ आरोपी नामे विशाल संतोषराव वाघ वय २४ वर्ष रा. गोवर्धना ता. रिसोड जि.वाशिम, अरविंद राजु काळे वय २४ वर्ष रा. गोवर्धना ता. रिसोड जि.वाशिम, राम गोविंदराव देशमुख वय २५ वर्ष रा. शेलगांव बगाडे ता. मालेगांव जि.वाशिम, अंकुश राजेशराव देशमुख वय २२ वर्ष रा. काले फाईल वाशिम ता. जि. वाशिम, अनिल दशरथ गवई वय २४ वर्ष रा. शेलगांव बगाडे ता. मालेगांव जि.वाशिम यांना अटक केली. सदर गुन्ह्यातील न्यायालयाने २३ ऑगस्ट पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केलेली आहे. सदर पोलीस कोठडी रिमांड मधिल आरोपीत यांच्या कडुन अर्धापुर जि. नांदेड येथील बाजारातून सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या दोन म्हशी किंमत अंदाजे ७० हजार रु. चे हस्तगत केले. तसेच सदर गुन्ह्यात आरोपीतांनी वापरलेले अशोक लेलॅन्ड कंपनिचे मालवाहू वाहन किंमत अंदाजे ४,० हजार रु. असा एकुन ४,७०,०००/- रु. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याकरीता मा. पोलीस अधिक्षक बच्चनसिंग साहेब, अप्पर पोलीस अधिक्षक गोरख भामरे उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिलकुमार पुजारी साहेब यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली पो.नि. सुनिल वानखडे साहेब, सपोनि जगदिश बांगर, पोहेकॉ संतोष पाईकराव, राजेंद्र वानखेडे, विनोद चव्हाण, नाचोको भिमराव गवई, पंजाब पुगे, श्रीकृष्ण नागरे, पोका प्रविण गोपनारायण, मनोज ब्राम्हण, विनोद घनवट, विनोद जायभाये, चालक पोकॉ ज्ञानबा खिल्लारे तसेच सायबर सेल वाशिम येथील पोकॉ दिपक घुगे यांनी प्रयत्न करुन गुन्हा उघडकीस आणला आहे.

चोरी झालेली जनावरे परत मिळण्याचे प्रमाण नगण्य असल्याने चोरी झालेल्या म्हशी परत मिळाल्याने सदर म्हशींचा मालक असलेल्या शेतकऱ्याने उत्साहाच्या भरात तपास पथकातील पोलिसांचा सत्कार केला, म्हशींना हार घालून शिरपूर बस स्थानक व गावातून वाजत गाजत मिरवणूक काढली, २ किलो पेढे वाटले, गावातील लोकांसाठी हा प्रकार नवीनच असल्याने काय झाले हे बघण्यासाठी नागरिकांनी एकच गर्दी केली होती.